1 5 FEB 2026

तरुण भारत

# बी. एस्सी, बी. एडसाठी १० मार्च अंतिम मुदत

**कोल्हापूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठात बी.एस्सी. बी.एड (आयटीईपी) या एकात्मिक चार वर्षांच्या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. या प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्याची अंतिम तारीख १० मार्च २०२६ आहे, अशी माहिती विभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी दिली. बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण किंवा ज्यांनी बारावी विज्ञान शाखेची आताच परीक्षा दिलेली आहे असे विद्यार्थी राष्ट्रीय परीक्षा एजन्सी यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या नॅशनल कॉमन एंट्रन्स टेस्ट (NCTE) देऊन अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. प्रवेश परीक्षा फॉर्मची लिंक httpsë// exams.nta.ac.in/NCTE/ असून अधिक माहितीसाठी इच्छूक विद्यार्थ्यांनी शिक्षणशास्त्र विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. सोनकांबळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 FEB 2026

सकाळ

# शाश्वत विकासासाठी संशोधन ही रसायनशास्त्राची सामाजिक जबाबदारी

## डॉ. इंद्रजित घोष : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र परिषद

कोल्हापूर, ता. १४ : 'शाश्वत विकासासाठी संशोधन हे रसायनशास्त्राच्या सामाजिक, नैतिक जबाबदारीचे अधोरेखन आहे,' असे प्रतिपादन झेक रिपब्लिक येथील व्हीएसबी-टेक्निकल ओसावा युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. इंद्रजित घोष यांनी केले. शिवाजी विद्यापीठात 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत विकास' यावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. घोष म्हणाले, 'हरित रसायनशास्त्र केवळ पर्यावरण संवर्धनाचे साधन नसून आर्थिकदृष्ट्या परवडणारा आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार विकासाचा मार्ग आहे. आपण निर्माण केलेली प्रत्येक अणुसंरचना, प्रत्येक प्रक्रिया आणि प्रत्येक उत्पादन भविष्यातील पिढ्यांसाठी महत्त्वाचा संदेश ठरणारे आहे, हे लक्षात घेऊन आपल्या संशोधनाच्या दिशा ठरविण्याचा हा कालखंड आहे. ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, नूतनीकरणीय कच्चा माल, जैव-उत्प्रेरण, सतत प्रवाही



परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. इंद्रजीत घोष.

तंत्रज्ञान आणि शाश्वत अर्थव्यवस्थेच्या संकल्पना या भविष्यातील औद्योगिक प्रगतीसाठी अत्यावश्यक ठरतील.'

डॉ. जाधव म्हणाल्या, 'शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी रसायनशास्त्राची भूमिका अधोरेखित करत ही परिषद विज्ञान, उद्योग आणि समाजातील सेतू म्हणून कार्य करेल. संशोधनातील आंतरशाखीय सहकार्य वाढीस लागण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांना जागतिकस्तरावरील संशोधन प्रवाहांची ओळख करून देण्याच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावेल.'

परिषदेचे समन्वयक डॉ. संजय कोळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. संदीप संकपाळ यांनी आभार मानले.

परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी मुंबई, डॉ. दिनेश सावंत एनसीएल पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन (आयआयटी मंडी) आदी शास्त्रज्ञांनी आधुनिक रसायनशास्त्राच्या विविध बाजूंवर विविध सत्रांमध्ये प्रकाश टाकला. उत्प्रेरक हरित रसायनशास्त्र, आयोनिक द्रव पदार्थांची निर्मिती, फोटो कॅटॅलिस्ट आणि हायड्रोजन संबंधित प्रक्रियासह ऊर्जा साठवणूक आणि ऊर्जा रूपांतरण तंत्रज्ञानातील नवकल्पनाबाबत परिषदेत चर्चा झाली. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देश-विदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले. दिवसभरात दोनशेहून अधिक शोधनिबंध सादर झाले.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी डॉ. शंकर हंगिर्गेकर, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. दिलीप दगडे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 FEB 2026 लोकमत

# रसायनशास्त्र परिषदेत २०० शोधनिबंध सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत विकास' या विषयावरील एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत देश-विदेशातील सुमारे ३५० संशोधक सहभागी झाले होते. या परिषदेत ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, नूतनीकरणीय कच्चा माल, जैव-उत्प्रेरण, हायड्रोजन प्रक्रिया व ऊर्जा साठवणूक या विषयांवर २०० हून अधिक शोधनिबंध सादर करण्यात आले.

झेल रिपब्लिक येथील व्हीएसबी-टेक्निकल ओसावा युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. इंद्रजित घोष यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. शाश्वत विकासासाठी संशोधन हे रसायनशास्त्राच्या सामाजिक, नैतिक जबाबदारीचे अधोरेखन आहे, असे प्रतिपादन त्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून केले.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. समन्वयक डॉ. संजय कोळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी प्रास्ताविकात परिषदेची भूमिका स्पष्ट केली. डॉ. संदीप संकपाळ यांनी आभार मानले. या परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी या नामवंत शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. परिषदेच्या यशासाठी डॉ. संजय कोळेकर, डॉ. संजय चव्हाण यांसह अन्य प्राध्यापकांनी प्रयत्न केले.

15 FEB 2026

लोकमत

# फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांची चित्रपट महामंडळाला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महामंडळाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे संचालक रणजित जाधव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिवाजी विद्यापीठाने चित्रपट निर्मितीचा अभ्यासक्रम सुरू करून कोल्हापूरची या क्षेत्रातील ओळख अधिक ठळक केली आहे.

याचा लाभ घेऊन चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगावा, असे आवाहन रणजित जाधव यांनी केले. विद्यार्थ्यांनी यावेळी चित्रपट महामंडळाची संस्थात्मक संरचना समजून घेतली. चित्रपट निर्मितीतील संघटनात्मक आणि व्यावसायिक पैलूंची यावेळी माहिती देण्यात आली.

यावेळी दिग्दर्शक सतीश बीडकर, बाबासाहेब खाडे, अलोक जत्राटकर, नम्रता गोडबोले आणि सिद्धेश मंगेशकर उपस्थित होते. व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी स्वागत केले.

1 5 FEB 2026
सकाळ



कोल्हापूर : दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवात यश मिळवलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# दक्षिण-पश्चिम युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाचे यश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्लीमार्फत आयोजित दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवात जेएसएस अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, श्री शिवरात्रीश्वरा नगर म्हैसूर (कर्नाटक) येथे नऊ ते १४ फेब्रुवारीदरम्यान झाला. यात युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश मिळवले.

संघात ६० सदस्य सहभागी होते.

महोत्सवात अनुक्रमे पाश्चिमात्य समूहगीत, शास्त्रीय तालवाद्य, हिंदी वक्तृत्व, मातीकाम, सुगम गायन, कातरकाम, व्यंगचित्र, रांगोळी, प्रश्नमंजूषा, पाश्चिमात्य एकल गायन, शास्त्रीय गायन, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, पश्चिमात्य एकल वाद्यवादन, लोकनृत्य, क्रिएटिव्ह कोरिओग्राफी, शास्त्रीय नृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य, स्थळचित्र, हिंदी वादविवाद, नकला या प्रकारांचा समावेश होता. शिवाजी विद्यापीठाला कला विभाग सर्वसाधारण विजेतेपद आणि सर्वसाधारण दुसरे उपविजेतेपद मिळाले. दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव विद्यापीठ संघास प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यापीठ संघाबरोबर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. टी. एम. चौगले उपस्थित होते. संघव्यवस्थापक म्हणून डॉ. ए. एस. बल्लाळ, प्रा. डॉ. शिला मोहिते यांनी काम पाहिले.

15 FEB 2026
तरुण भारत

# एम. एड., बी. एड. प्रवेशासाठी २४ रोजी अंतिम मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे एम. एड आणि बी. एड., एम. एड. (एकात्मिक) अभ्यासक्रमाचे २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २४ रोजी पर्यंत आहे, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी दिली आहे. एम. एड. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक पात्रता कोणत्याही शाखेतील पदवीधर व डी. एल. एड किंवा बी.एड. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अंतिम वर्षाची परीक्षा दिलेले विद्यार्थी एम.एड.साठी पात्र ठरणार आहेत. बी.एड एम.एड (एकात्मिक) या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवीची अंतिम परीक्षा दिलेले विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या स्टेट कॉमन एंट्रन्स टेस्ट सेल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या पात्रता परीक्षेद्वारे प्रवेश घेऊ शकतात. या प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख २४ फेब्रुवारीपर्यंत असून संकेतस्थळावर प्रवेश परीक्षा फॉर्म उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. सोनकांबळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 FEB 2026
पुण्यनगरी

# लेखणीतून समाज बदलण्याचे प्रयत्न व्हावेत : डॉ. व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर : प्रतिनिधी

साहित्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. सर्वांनी लिहिते व्हावे, पूर्वीच्या काळचे जगणे हे स्वत:साठी होते, आता ते दुसऱ्यांना दाखवण्यासाठी झाले आहे. समाज बदलण्यासाठी सातत्याने प्रयत्न असावेत आणि हे फक्त लेखणीतून साध्य होते, म्हणून प्रत्येकाने लिहीत राहावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात केले.



हिंदी उपन्यास व तुषार अमृताचे या पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून पी. बी. झावरे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. मंजिरी मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. बी. भुयेकर, एम. एम. कांबळे आदी.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर लिखित तिन्ही उपन्यास चेतना के नये आयाम व प्रा. एम. एम. कांबळे लिखित तुषार आनंदाचे विनो कथा संग्रह या दोन पुस्तकांचें कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी हिंदी विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील व प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी बोलताना आपल्या जीवनातील अनुभव लिहीत असताना यातून खूप प्रगती होते. आपल्यातील स्वार्थ आपले जगणे अवघड करतो, यासाठी आपल्यात निस्वार्थ लेखन आणि दानत असावी लागते. प्रत्येक वीस वर्षांनी जुने शब्द बदलून नवीन शब्द येत असतात म्हणून वाचन व लेखन महत्त्वाचे आहे.

डॉ. पी. एस. पाटील यांनी बोलताना जीवनामध्ये विविध विषयांवर जे विचार करतात ते प्रयत्नशील ठरतात. सर्वांगाने विचार केला, तर ते अनुभव मिळतात ते समाजासाठी उच्च मनाचे असतात. वाचन मानसाला विचार करायला लावते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांनी सुरुवातीपासून संस्थेने केलेले कार्य आपल्या मनोगतामध्ये मांडले. स्वागत व प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. पी. बी. झावरे यांनी करून दिला.

कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, चेअरमन प्रा. डॉ. मंजिरी मोरे, शिक्षण प्रसारक मंडळाचे पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, प्रशासन अधिकारी पृथ्वी मोरे, एम. एल. धनवडे, रवींद्र सुतार, एस. आर. घाटगे, एस. एन. बोरवडेकर, तसेच सर्व प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. आवटे यांनी केले, आभार उपप्राचार्य एन. टी. पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
15 FEB 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासासाठी संशोधन ही रसायनशास्त्राची नैतिक जबाबदारी

## डॉ. घोष : दिवसभरात दोनशेहून अधिक शोधनिबंध सादर

**जनप्रवास : कोल्हापूर**

शाश्वत विकासासाठी संशोधन हे रसायनशास्त्राच्या सामाजिक, नैतिक जबाबदारीचे अधोरेखन आहे, असे प्रतिपादन झेल रिपब्लिक येथील व्हीएसबी- टेक्निकल ओसावा युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. इंद्रजित घोष यांनी केले. शिवाजी विद्यापीठात 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत विकास' या विषयावर आयोजित एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

यावेळी डॉ. घोष म्हणाले, हरित रसायनशास्त्र हे केवळ पर्यावरण संवर्धनाचे साधन नसून आर्थिकदृष्ट्या परवडणारा आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार विकासाचा मार्ग आहे. आपण निर्माण केलेली प्रत्येक अणुसंरचना, प्रत्येक प्रक्रिया आणि प्रत्येक उत्पादन हे भविष्यातील पिढ्यांसाठी महत्त्वाचा संदेश ठरणारे आहे, हे लक्षात घेऊन आपल्या संशोधनाच्या दिशा ठरविण्याचा हा कालखंड आहे.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य, सामाजिकदृष्ट्या न्याय्य आणि पर्यावरणीयदृष्ट्या संतुलित संशोधनाची आज सर्वच क्षेत्रांत आवश्यकता आहे. रसायनशास्त्राच्या क्षेत्रात ही जबाबदारी स्वीकारून या परिषदेत सर्वंकष चर्चा होत आहे, ही आनंदाची बाब आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी रसायनशास्त्राची भूमिका अधोरेखित करत ही परिषद विज्ञान, उद्योग आणि समाज यांच्यातील सेतू म्हणून कार्य करेल. संशोधनातील आंतरशाखीय सहकार्य वाढीस लागण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संशोधन प्रवाहांची ओळख करून देण्याच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. परिषदेचे समन्वयक डॉ. संजय कोळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. संदीप संकपाळ यांनी आभार मानले.

**सतत प्रवाही तंत्रज्ञान.**

ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, नूतनीकरणीय कच्चा माल, जैव-उत्प्रेरण, सतत प्रवाही तंत्रज्ञान आणि शाश्वत अर्थव्यवस्थेच्या संकल्पना या भविष्यातील औद्योगिक प्रगतीसाठी अत्यावश्यक ठरणार आहेत, असेही डॉ. घोष यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील परिषदेत मार्गदर्शन करताना झेक येथील ओसावा युनिव्हर्सिटीचे डॉ. इंद्रजित घोष.

### देशविदेशांतील नामांकित संशोधकांचे मार्गदर्शन

या परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी नामवंत शास्त्रज्ञांनी परिषदेस उपस्थित राहून आधुनिक रसायनशास्त्राच्या विविध बाजूंवर विविध सत्रांमध्ये प्रकाश टाकला. उत्प्रेरक हरित रसायनशास्त्र, आयोनिक द्रव पदार्थांची निर्मिती, फोटो कॅटॅलिस्ट आणि हायड्रोजन संबधित प्रक्रियासह उर्जा साठवणूक आणि उर्जा रूपांतरण तंत्रज्ञानातील नवकल्पना इत्यादींबाबत परिषदेत सविस्तर चर्चा करण्यात आली. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देशविदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले. दिवसभरात दोनशेहून अधिक शोधनिबंध सादर करण्यात आले. परिषदेच्या यशस्वितेसाठी डॉ. शंकर हंगीर्गेकर, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. दिलीप दगडे यांनी परिश्रम घेतले.

15 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# विभागीय युवा महोत्सवात विद्यापीठाचे घवघवीत यश

## कला विभाग सर्वसाधारण विजेतेपदासह सर्वसाधारण दुसरे उपविजेतेपद प्राप्त

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली मार्फत आयोजित दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव २०२५-२०२६ जेएसएस ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन ॲंड रिसर्च, शिवरात्रीश्वरा नगर, म्हैसूर (कर्नाटक) येथे ९ ते १४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत आयोजित केलेला होता. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा एकूण ६० सदस्यांचा संघ सहभागी होऊन संघाने खालील स्पर्धेत क्रमांक प्राप्त केले आहेत.




पाश्चिमात्य समूहगीत - प्रथम क्रमांक, शास्त्रीय ताल वाद्य - प्रथम क्रमांक, हिंदी वक्तृत्व - प्रथम क्रमांक, मातीकाम - प्रथम क्रमांक, सुगम गायन - द्वितीय क्रमांक, कातरकाम - द्वितीय क्रमांक, व्यंगचित्र - द्वितीय क्रमांक, रांगोळी - द्वितीय क्रमांक, प्रश्नमंजूषा - तृतीय क्रमांक, पाश्चिमात्य एकल गायन - तृतीय क्रमांक, शास्त्रीय गायन - चतुर्थ क्रमांक, भारतीय समूहगीत - चतुर्थ क्रमांक, लोकसंगीत वाद्यवृंद - चतुर्थ क्रमांक, पश्चिमात्य एकल वाद्यवादन - चतुर्थ क्रमांक, लोकनृत्य - चतुर्थ क्रमांक, क्रिएटिव्ह कोरोओग्रॉफी : चतुर्थ क्रमांक, शास्त्रीय नृत्य - चतुर्थ क्रमांक, लघुनाटिका - चतुर्थ क्रमांक, मुकनाटय - चतुर्थ क्रमांक, स्थळ चित्र - चतुर्थ क्रमांक, हिंदी वादविवद - पाचवा क्रमांक, नकला - पाचवा क्रमांक.

तसेच कला विभाग सर्वसाधारण विजेतेपद व सर्वसाधारण दुसरे उपविजेतेपद विद्यापीठास प्राप्त झाले. सदर दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव विद्यापीठ संघास मा. प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी, मा. प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. श्रीमती. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यापीठ संघासोबत डॉ. रघुनाथ ढमकले, व्यवस्थापन परीषद सदस्य, डॉ. टी. एम. चौगले संचालक, विद्यार्थी विकास हे उपस्थित होते. तसेच शिवाजी विद्यापीठ संघासाठी संघव्यवस्थापक म्हणून डॉ. ए. एस. बल्लाळ, आजरा महाविद्यालय, आजरा व प्रा. डॉ. शिला मोहिते, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव. जि. सांगली यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
15 FEB 2026 पुण्यनगरी

# युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा डंका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने घवघवीत यश मिळवले. भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्लीतर्फे म्हैसूर (कर्नाटक) येथील जेएसएस ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च येथे दि. ९ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत आयोजन केले होते. महोत्सवात विद्यापीठाने कला विभागात सर्वसाधारण विजेतेपद, महोत्सवात सर्वसाधारण दुसरे उपविजेतेपद पटकावले.



कोल्हापूर : दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवात यश मिळवलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

विद्यापीठाच्या ६० सदस्यांच्या या संघाने विविध स्पर्धांमध्ये अव्वल क्रमांक मिळवले. यामध्ये पाश्चिमात्य समूहगीत, शास्त्रीय ताल वाद्य, हिंदी वक्तृत्व आणि मातीकाम स्पर्धेत संघाने प्रथम क्रमांक पटकावला. सुगम गायन, कातरकाम, व्यंगचित्र, रांगोळी स्पर्धेत द्वितीय, तर प्रश्नमंजूषा, पाश्चिमात्य एकल गायन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय शास्त्रीय गायन, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, पाश्चिमात्य एकल वाद्यवादन, लोकनृत्य, क्रिएटिव्ह कोरिओग्राफी, शास्त्रीय नृत्य, लघुनाटिका, मूकनाट्य आणि स्थळचित्र या स्पर्धांमध्ये चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. हिंदी वादविवाद आणि नकला स्पर्धेत संघ पाचव्या क्रमांकावर राहिला. विद्यापीठ संघाच्या या यशाबद्दल प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विशेष अभिनंदन केले. संघासोबत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले उपस्थित होते. संघ व्यवस्थापक म्हणून आजरा महाविद्यालयाचे डॉ. ए. एस. बल्लाळ, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगावच्या डॉ. शीला मोहिते यांनी काम पाहिले. या यशात विद्यार्थी विकास विभागाचे मोलाचे सहकार्य लाभले.

1 5 FEB 2026

सकाळ



कोल्हापूर : येथील गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय येथे पुस्तक प्रकाशन समारंभावेळी अध्यक्षा मंजिरी देसाई-मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. एन.शिंदे, डॉ. पी. एस. पाटील व इतर मान्यवर.

# लेखणीतून समाज बदलण्याचे प्रयत्न व्हावेत : डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. १४ : 'साहित्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. सर्वांनी लिहिते व्हावे. पूर्वीच्या काळचे जगणे हे स्वतःसाठी होते. आता ते दुसऱ्यांना दाखवण्यासाठी झाले आहे. समाज बदलण्यासाठी प्रयत्न असावेत. हे लेखणीतून साध्य होते, म्हणून प्रत्येकाने लिहित राहावे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय येथे आयोजीत पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर लिखित ''हिंदी उपन्यास'' व प्रा. एम. एम. कांबळे लिखित ''तुषार आनंदाचे'' या दोन पुस्तकांचे कुलसचिव डॉ. शिंदे व माजी हिंदी विभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सचिव जयकुमार देसाई, कौन्सिल सदस्य दौलतराव देसाई, अजित मोरे, पृथ्वी मोरे यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले.

डॉ. शिंदे म्हणाले, ''आपल्या जीवनातील अनुभव लिहीत असताना यातून खूप प्रगती होते. आपल्यातील स्वार्थ आपले जगणे अवघड करतो. यासाठी आपल्यात निस्वार्थ लेखन आणि दानत असावी लागते. प्रत्येक वीस वर्षानी जुने शब्द बदलून नवीन शब्द येत असतात. म्हणून वाचन आणि लेखन महत्त्वाचे आहे.'' डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''जीवनामध्ये विविध विषयावर जे विचार करतात ते प्रयत्नशील ठरतात. सर्वांगाने विचार केला तर जे अनुभव मिळतात ते उच्च मनाचे असतात. वाचन माणसाला विचार करायला लावते.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी संस्थेचे कार्य मांडले. स्वागत, प्रास्ताविक व परिचय प्रा. पी. बी. झावरे यांनी केले. प्रा. एन. टी. पाटील यांनी आभार मानले. यावेळी पर्यवेक्षिका एम. एल. धनवडे, प्रा. आर. बी. सुतार, प्रा. एस. आर. घाटगे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.